| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **CNR. No.MHBU**090006812019.<br>निशाणी क्रमांक–२३. | दाखल दिनांक | : | १०/०७/२०१९ | | |
| | नोंदणी दिनांक | : | १०/०७/२०१९ | | |
| | निकाल तारीख | : | २४/०३/२०२६ | | |
| | कालावधी | : | वर्ष | महिना | दिवस |
| | | | ०६ | ०८ | १४ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालय, जळगाव (जामोद).**

**(पिठासीन न्यायाधीश श्रीमती प्रिती.डी. मेंढे)**

**न्यायनिर्णय**

**(दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी पारीत)**

**नियमित फौजदारी मामला क्रमांक १३२/२०१९.**

**अपराध क्रं. २१५/२०१९, पोलीस स्टेशन, जळगाव (जामोद).**

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, जळगाव (जामोद),<br>ता. जळगाव (जामोद), जिल्हा बुलढाणा. |
| यांचे तर्फे | | सहा. सरकारी अभियोक्ता: श्री. ए.जे. इंगळे |
| **आरोपी** | ०१ | **पद्माकर ओंकार तायडे**<br>वय–४० वर्षे, व्यवसाय – शेती,<br>आरोपी रा. झाडेगाव, ता. जळगाव जामोद,<br>जि. बुलढाणा. |
| यांचे तर्फे | | विद्वान वकील श्री. आर. जी. इंगळे. |
| गुन्हा घडल्याचा दिनांक | | ०८/०४/२०१९ |

| | |
|---|---|
| प्रथम खबरचा दिनांक | ०९/०४/२०१९ |
| दोषारोपपत्र दिनांक | १०/०७/२०१९ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०३/१२/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १२/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयसाठी राखीव दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याचा दिनांक | २४/०३/२०२६ |
| शिक्षा झाल्याचा दिनांक | निरंक. |

**आरोपींची माहिती**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | आरोपीच्या जमानतचा दिनांक | कलम व कायदा | आरोपी दोषी किंवा निर्दोष | शिक्षा झाल्याचा दिनांक | कलम ४२८, फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पद्माकर ओंकार तायडे | ३०/०६/१९ | ३०/०६/१९ | भा.दं.वी. कलम २९४,५०६ अन्वये दंडनिय | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अपराध, | | | |

**<u>अभियोग पक्षाचे / बचावपक्षाचे/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी</u>**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | उमेश सुरेश निवणे (नि.क्र.२०) | फिर्यादी |

१. आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ५०६ अंतर्गत खटला चालविण्यात आला.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, दिनांक ०८/०४/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादी–उमेश सुरेश निवणे यांची पत्नी त्यांच्या दिराच्या वेल्डींग दुकानावर असतांना आरोपी तेथे उभा होता. त्याने फिर्यादीच्या पत्नीला विचारले की, ट्रॅक्टर कुठे आहे त्यावरून तिने बाजुच्या शेतात आहे असे सांगितल्यावर त्याने तिला ट्रॅक्टर भाड्याने पाहिजे असे म्हटले असता फिर्यादीच्या पत्नीने मागील बाकी असलेले पैसे द्या त्यानंतर ट्रॅक्टर घेवुन जा असे म्हटले असता आरोपीने एकदम अश्लील भाषेमध्ये "मादरचोद, छिनाल तु माझ्याशी बोलु नको तो हरामखोर कुठे गेला त्या नालायकाला येवु दे व तुला किती पैसे पाहिजे ते सांग” असे बोलुन हरामखोर तु बाहेर निघ तुला पाहुन घेतो असे म्हणुन जिवाने मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली.

३. फिर्यादीने आरोपीविरुध्द दिलेल्या फिर्यादवरुन अपराध क्रमांक २१५/२०१९ भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ५०६ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला. तपासा अंतर्गत संबंधीत तपासी अंमलदार यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. त्याचप्रमाणे फिर्यादीचे व साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

४. आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ५०६ अंतर्गत दोषारोप

(निशानी क्र.९) निश्चीत करण्यात आला आणि आरोपीने सदर आरोपांचा त्याला गुन्हा कबुल नसल्याचे आणि खटला चालविण्याची विनंती केली.

**५.** अभियोग पक्षाचा पुरावा व आरोपीचा बचाव लक्षात घेता खालील मुद्दे उपस्थीत होतात. मी त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक ०८/०४/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजताच्या दरम्यान मौजा झाडेगाव., ता. जळगाव जामोद येथे आरोपीने फिर्यादीच्या पत्नीला सार्वजनिक ठिकाणी "मादरचोद, छिनाल तु माझ्याशी बोलु नको तो हरामखोर कुठे गेला त्या नालायकाला येवु दे व तुला किती पैसे पाहिजे ते सांग" अशी अश्लील शिवीगाळ केली व त्याव्दारे आरोपीने भां.दं.वि. चे कलम २९४ नुसार गुन्हा केला ? | **<u>नकारार्थी</u>**. |
| २. | उपरोक्त वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या पत्नीला जिवाने मारण्याची धमकी दिली व त्याव्दारे आरोपीने भा.दं.वि. चे कलम ५०६ नुसार गुन्हा केला ? | **<u>नकारार्थी</u>**. |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**६.** अभियोग पक्षाने आरोपीविरूद्ध दोषसिद्धी करण्यासाठी एका साक्षदाराला तपासले. फिर्यादी साक्षीदार क्र. १ उमेश सुरेश निवणे यांची साक्ष (नि.क्र.२०) वर, तोंडी रिपोर्ट (नि.क्र.२१) व प्रथम खबरी अहवाल (नि.क्र.२२) वर तपासण्यात आला. तसेच आरोपी व फिर्यादी यांची न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाल्याबाबतचा अर्ज (नि.क्र.१८) व

पुरसीस (नि.क्र. १९) वर दाखल केली आहे. आरोपीचे फौ.प्र.सं. कलम ३१३ चे बयाण नोंदविण्यात आले नाही.

**<u>मुद्दा क्र १ व २ :–</u>**

७. मुद्दा क्र. १ व २ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे ते एकत्र विचारात घेतले आहेत.

८. फिर्यादी उमेश सुरेश निवणे सा.क्र. ०१ यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, ते सर्व आरोपीला ओळखतात कारण ते त्यांच्या गावात राहतात. आरोपीसोबत काय घटना घडली होती हे त्यांना आठवत नाही. त्यांनी आरोपीविरूध्द पोलीस स्टेशनला जावुन तक्रार दिली होती. दि. ०९/०४/२०१९ रोजीचा रिपोर्ट व प्रथम खबरी अहवालावर त्यांची सही असुन त्यातील मजकुर त्यांना माहिती नाही. त्यांनी नाकारले की, त्यांना व त्यांच्या पत्नीला आरोपीने शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली होती त्यामुळे त्यांनी आरोपीविरूध्द तक्रार दिली होती. पोलीसांनी त्यांचे बयान नोंदविले नव्हते. साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारले असता सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारात्मक दिली. तसेच सदरहु साक्षीदाराने आरोपी व त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाली असुन त्याबाबतचा अर्ज (नि.क्र.१८) व पुरसीस (नि.क्र. १९) वर दाखल केल्याचे त्यांनी कथन केले. तसेच त्यांना आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार नसुन आरोपीविरुध्द प्रकरण पुढे चालवायचे नाही, असे ते सांगतात.

९. सदर प्रकरणातील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी व आरोपीमध्ये आपसात तडजोड झाली आहे. फिर्यादीने सदर प्रकरणातील फिर्याद मधील मजकुर नाकारल्यामुळे त्या कायद्यातील तरतुदी प्रमाणे सिद्ध झाल्या नाही. फिर्यादी व आरोपीमध्ये आपसी तडजोड झाली असुन त्याबाबतचा अर्ज (नि.क्र.१८) व पुरसीस (नि.क्र. १९) वर असुन फिर्यादीला आरोपीविरुद्ध प्रकरण पुढे चालवायचे नसल्याचे त्यांनी त्यांच्या

साक्षेत सांगितले आहे. आरोपीने फिर्यादी व त्यांच्या पत्नीला अश्लील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली होती. त्यामुळे त्यांनी आरोपीविरूध्द तक्रार दिली होती. हया बाबी अभिलेखावर आल्या नाही. अभियोग पक्षाने ज्या कलमाखाली सदरचे प्रकरण दाखल केले त्या कलमातील पूरक घटक अभियोग पक्ष निसंशयपणे सिद्ध करू शकले नाही. अभिलेखावर आलेला पुरावा आरोपीला शिक्षेपर्यंत नेण्याचा गुणवत्तेचा नाही. करीता मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते.

**<u>मुद्दा क्र. ३:–</u>**

**१०.** मुद्दा क्र. १ व २ च्या निष्कर्षावरून असे दिसून येते की, अभियोग पक्ष आरोपी विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्यास अयशस्वी ठरला. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. तसेच मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>– आ दे श –</u>**

१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधान कलम २९४, ५०६ मधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीने संपरिक्षेदरम्यान दाखल केलेली वैयक्तीक व जमानती बंधपत्रे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) नुसार ६ महिन्यापर्यंत कायम ठेवण्यात येतात. सदर कालावधीत या प्रकरणात आवाहन न झाल्यास बंधपत्रे रद्द होतील व जमानतदार बंधपत्रातून मुक्त होतील.

३. न्यायनिर्णय खूल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PRITI DNYANESHWAR MENDHE
Date: 2026.03.27 18:05:44 +0530

ठिकाण– जळगाव (जामोद). (श्रीमती प्रिती ज्ञा. मेंढे)
दिनांक: २४/०३/२०२६. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
जळगाव (जामोद).

**प्र मा ण प त्र**

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशातील मजकुराशी शब्दांशब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावः–  दिपक के. मतकर, लघुलेखक श्रेणी –३.

कोर्टाचे नावः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जळगाव जामोद.

दिनांकः–  २७/०३/२०२६.